
 

गणपुले फाऊंडेशन प्रस्तुत

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ख २ | अंक – पयलो



प्रकाशन दिनांक : पौष कृ. पंचमी | १८ जाने. २०२५

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्र्व २ | अंक – पयलो

जानेवारी २०२५

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ष २ | अंक – पहिला

संपादिका

सौ. आरती मोने

प्रमुख मार्गदर्शक

श्री. अशोक नेने

संपादक मंडळ

श्री. वासुदेव दामले, सौ. गायत्री भुस्कुटे

मुखपृष्ठ, संकलन, अक्षर जुळवणी, प्रकाशन

गणपुले फाऊंडेशन, ठाणे, महाराष्ट्र

साहित्य पाठविण्या साठी..

info@ganpulefoundation.org

व्हॉटस्यॅप: +९१ ९९२० ३४५८६१

टीप:
साहित्य पाठवीताना, टाईप करून पाठवावं. स्कॅन
किव्हा pdf रूपात पाठऊ नये.

© गणपुले फाऊंडेशन.
या अंकातील मजकूर प्रकाशकांच्या परवानगी
शिवाय अन्यत्र प्रकाशित करण्यास मनाई आहे.

या अंकात वापरण्यात आलेली चित्रे इंटरनेट वरून घेण्यात आली आहेत.
सर्व चित्रांचे कॉपी राईट मूळ लेखकांचे व संकेत स्थळांचे आहेत.

अंकात व्यक्त झालेली मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत.
त्याच्याशी संपादिका व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. संपादकीय (आरती मोने) . ..............................................................५

२. गणपुले फाऊंडेशन चे वतीन (वैभव गणपुले) ...........................................७

३. दिवाळी अंकाबद्दल खुलासा ...............................................................८

४. तांदूळ – मोठ्ठा धन (देवश्री गोडबोले) ...................................................९

५. ल्हानपणाचो काळ सुखाचो (प्राची प्रमोद परांजपे)..................................१०

६. नाचणीचो केक (शीतल रानडे) ........................................................१३

७. पुस्तक परिचय “क्ष किरणें” (गायत्री भुस्कुटे) ........................................१४

८. आमचो राखणो नकुळ (सुभाष जोशी)...............................................१७

९. प्रवास वर्णन (अश्विनी फाटक)........................................................२१

१०. गोंधळ सगळो (रामकृष्ण दिनकर सोमण)...........................................२३

११. ऐतिहासिक व्यक्ती "आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य“ (देवश्री गोडबोले) . ...........२४

१२. माजी ई. पयलीची सहल (वर्षा केळकर) ............................................२७

१३. बालपण देगा देवा (विदुला ताम्हनकर)..............................................२८

१४. मकर संक्रांत (दूर्वा दामले)............................................................२९

१५. नातवंडानी भरलेला गोकुळ (रमा गोविंद जोशी)....................................३०

१६. माझी सहल (नरेश दामले)..............................................................३१

१७. माजी फजिती (मिनल नेने). ............................................................३३

१८. पाचक आलां - लिंबू लोणचां (रमा गोविंद जोशी). ..................................३४

१९. मेट्रो सफर (दीप्ती दामले)..............................................................३५

२०. भोजपुर - एक प्रेक्षणीय स्थळ (अक्षज जोशी).......................................३७

२१. माहेर घर (पूजा मराठे) ................................................................३८

२२. श्री आगमन (मिनल आगाशे / आरती मोने)..........................................३९

# संपादकीय



सरतां वर्ख, फुलती कोमरी !

म्हण्टा म्हण्टा चोरपावलान इंग्रजी वर्ष सोपों लागलां.. थोडे पोसे सुखान भर्ले जाले थोडे कोडू गोड अनुभव आयले. बघा, जेड्ला आमी वार्षिक परीक्षा पास हसों तेडला पुढले वर्गात जाय्वेची ओढ ससे पण असे वेळा पाठले वर्गात घडलेल्यो घटना यवजले शिवाय ऱ्हेत नाय. दुसरी गजाल सांगेची जाले, जेड्ला आमला एक घर सोडनीं दुसरे घरात जाय्वेचां ससे तेड्ला मन कळवळसे; कारण, जुने घराचो कोन्सेनकोन्सो आमचेकडा संवाद साधीत ससे. अगदी तसांच, जेड्ला वर्ष बदलसे तेड्ला गत वर्षाच्यो अनेक गजाली डोळेपुढां येसत. मात्र बरी शिकवण मनात घेव्नी पुढां जाणां होच  एक नवो संकल्प हंव शकसे.

मात्र शंभर टक्के ही गजाल खरी से की, "आठवणींचो आहेर देव्वेचां सामर्थ्य फक्त भूतकाळाकडाच ससे..!" शेवटी भूतकाळ म्हणजे तरी कितां  ? अनेक अनुभव, आठवणी हेचा बांधलेलां बोचकां. असां म्हणसत, आयुष्यात पुढां जाय्वेचां जाले कितां तरी पाठल्या सोडेवां पडसे म्हणजेच आयुष्यांतले दिवस जे परत केड्लाच परत मिळत नाय. वर्ष केंचाय सों, एक गोष्ट तां प्रत्येकाला शिकयसे, तां म्हणजे आपले कोण! परके कोण! जेनां आमी आमचे म्हणसो ते कठीण काळात धाव्नी येसत काय नाय हे कळसे. एखादे नवे व्यक्तीचे येणेंन जसां आयुष्य बदलसे तसांच कायजण अचानक आयुष्याथींन जाणेंन तांच आयुष्य "एतां ते व्यक्तीशिवाय कसां जगेचा असो प्रश्न पडसे."

## .... संपादकीय

नवीन वर्षात आमी अनेक संकल्प करसो, पण काही कारणानं  ते पूर्णत्वाला जात नाय, विशेष करनी बायलांचे. कारण, घरची जबाबदारी, आर्थिक स्थिती, दुखणी- खुपणी हे सगळे गोष्टीमुळां संकल्प तसेच ऱ्हेसत. वर्ष बदललां तरी व्यथा सोपत नाय. मनांतली घुसमट व्यक्त करे वेळ मिळत नाय....  वर्ष केड्लाच वाईट नस्से पण पूर्ण वर्षात आमला बरे वाईट अनुभव मिळसत जे आमी हेचे पयलीं केड्ला अनुभवलेले नस्सत इतकांच. म्हणीच म्हणसत "सुखाचे धेंडलेवर दुःख बेसलेलांच ससे.".

सो... सुर्याला सुद्धा परतो उगवत्याला येव्वे मावळेचा पडसे! तेच पद्धतीन नवो संकल्प करनीं नवे वर्षाचां स्वागत करे सज्ज होवया.सगळे संकल्प पूर्ण करुया.

वर्ष आपलेच झेतान चालेल,
आमी ध्येय साधीत जावया
पोसेंत घेव्नी क्षण सुखाचे,
आनंदी आनंदात ऱ्हेवया

✍️ **सौ. आरती मोने** – संपादिका
सारवळी, गोवा.
फोन: ७०३८०६२५३६

## गणपुले फाऊंडेशन चे वतीन

हो अंक जेड्ला सुरू केलो तेड्ला विचार केलो नतलो की हे अंकाला मोठो प्रतिसाद गावेल.

परंतु सगळे साहित्यिक, वाचक वर्ग, संपादक मंडळ, संपादिका, हितचिंतक अणि उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक हेंचे प्रयत्ना मुळा दुसरे वर्खाचो अंक प्रकाशित जालो. कालच प्रकाशनचे कार्यक्रमात मा.कृष्ण वझे हेंनी खरांच म्हटला से की "चित्पावनी बाळसा धरू लागली सें". त्याचा संगोपन करे साठी प्रत्येक चित्पावन व्यक्तीचो प्रयत्न महत्वाचो से.

चित्पावनीचो प्रसार हैवो म्हणी तुमचे नातलग अणि चित्पावन संघ सदस्य हेंना हो अंक धाडा, अंका बद्दल माहिती द्या.

दिवाळी विशेष अंकामुळां जे अनुभव मिळ्ळे  सत तेंचो उपयोग आमी पुढले अंकासाठी करणार सों अणि अणिकय दर्जेदार अंक घेव्नी येणार सों.

हे अंकाचा सगळेंत मोठां यश म्हणजे, चित्पावनी भाषेची तोंड ओळख हि कार्यशाळा ज्या लोकांनी केली ते एतां लिखाण करू लागले सत.

तुम्ला वैयक्तिक किंवा तुमचे चित्पावन संघ सदस्यांना जर चित्पावनी भाषा शिकेची सयेल जालेवर आम्ला नक्की संपर्क करा.

मकर संक्रांती बरोबर हे चित्पावनीचा संक्रमण खूप लोकांना हे उपक्रमात जोडणार से हे बद्दल माला शंका नाय.

धन्यवाद!

**वैभव गणपुले**
संयोजक - गणपुले फाऊंडेशन, ठाणे, महाराष्ट्र

# दिवाळी अंकाबद्दल खुलासा

आपण सर्वांनी जो प्रतिसाद दिवाळी अंकाला दिला त्या बद्दल आभार. ईतीहासात पहिल्यांदाच चित्पावनी मधील दिवाळी अंक सर्वांच्या सहकार्यामुळे प्रकाशित होऊ शकला.

३२५ प्रति संपल्यानंतर सुद्धा अंकासाठी मागणी होत होती परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे जादा प्रति छापता आल्या नाहीत. आम्हाला कल्पना आहे की या मुळे चित्पावनी वाचक वर्गाचा अपेक्षा भंग झाला. पुढच्या दिवाळी अंकाचं नियोजन अजून चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न आम्ही नक्की करू. आपण या कार्यात असाच सहभाग घेऊन चित्पावनी कार्याला पाठिंबा देत राहाल अशी आम्ही आशा करतो.

तसेच, अंका मध्ये ज्या काही चुका झाल्या आहेत त्या होऊ नयेत म्हणून आम्ही योग्य ती काळजी घेऊ.

**माहेर घर या कविते बद्दल:**
दिवाळी अंकात पृष्ठ क्र. ९७ वर प्रकाशित झालेली **"माहेर घर"** ही कविता **सौ. पूजा मराठे, गोवा** यांची आहे याची कृपया नोंद घ्यावी.

**श्री आगमन या कविते बद्दल:**
दिवाळी अंकात पृष्ठ क्र. ९४ वर प्रकाशित झालेली **"श्री आगमन"** ही कविता **सौ. मिनल आगाशे, पुणे** यांच्या मुळ मराठी कवितेवर आधारित आहे याची कृपया नोंद घ्यावी.

वरील चुकांबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत आणि अशा चुका पुन्हा होणार नाहीत या साठी योग्य ती काळजी भविष्यात घेऊ.

- **गणपुले फाऊंडेशन, ठाणे**

# तांदूळ - मोठ्ठा धन

बारकेले बाबूला आटवल भरोवया ।
सगळेंना आवडसे, सांबारां भात करूया ॥

माला आवडसे पीठाचा थालीपीठ ।
भितर घालनी कांदो, मिरसांग अणि मीठ ॥

तांदूळ म्हंजे धनाचाच रूप, ।
सत्यनारायणाचे तामणांतला देवस्वरूप ।।

ओटी भरूया घालनी तांदूळाची मूठ ।
कपाळाला अक्षतांची बारीकशी चिमूट ॥

हॉकलाचे केळवणाला पाच पक्वान्नांत साखरभात ।
उकडीचे मोदक खास
चतुर्थीला हवेतच पानांत ॥

लग्नांत हवोच चमचमीत काळोभात ।
अणि एकदा करूया गॉडसा म्हणी खीर नायले साखरभात ॥

केशरी हिरव्या भाज्यांचो पुलाव सजेयसे ताट ।
वरणभातान् सदाच हसे जेवणाची सुरवात ॥

भाजनी वाटनी केल्यो चणेगाठी, बरोबर सादे वडे ॥
श्राद्ध म्हाळाला सुध्दा करसत गॉडाचे वडे ॥

तोवसळी खांटोळी पचेला बरी ।
श्रावणातले पदार्थांच्यो एकेक परी ॥


करनी कण्यांचो उपयोग, कणेरो खावया पॉटभर ।
उकड देवया करनी
आजीला, पळीवाढी आंबटसर ॥

ताळो शेकोवया थंडी जायेल, पिवनी आटवलाचो निवळ ।
पॉटातली गरमी शांत करील ताकभात केवळ ॥

ऊसळे कर गो आई सादांच आज जेवया ।
तांदूळाचे पदार्थ सगळे कितां ही किमया ॥

**सौ. देवश्री गोडबोले** – कोथरूड, पुणे (फोन: ९०११९५८७२५)

# ल्हानपणाचो काळ सुखाचो



ल्हानपणाचो काळ, थोडो सुखाचो थोडो हलाखीचो बी सलो. पण माणसान सदांच सकारात्मक दृष्टिकोन थेवनीं आपले जीवना कडा बघितलां झाले में सुखाचो असां म्हणसां. ल्हान सतानाच बाबा देवाघरा गेलेमुळां बापुय हे नातेलाच में पोरकी झालेली. आईची आर्थिक परिस्थिती तितकीशी बरी नतली म्हणी त्याचेपाश्णी लांब मामात्यां न्हेवेची पाळी माझेवर आयली. तेडला में अवघी पांचच वर्खांची सल्यां. नातां म्हणजे मामा, मावशी इतकांच खबर. असे परिस्थितींत मामा माला आपलेकडा घेवनीं आयलो.

माझो मामा श्रीराम भावे, जणू वात्सल्याची खाणच! दिसताना रागीट दिसे. पण भितरथीन मात्र तो खूपच प्रेमळ सलो. माला तेणी, मात्यापाश्णी गणपती घडयसत तशी घडयलीन. आज ज्यांहां में न्हेसां त्यांहां अगदीं मानान जगसां. माला घडयताना तेला कितके कष्ट पडले सतील तां फक्त तोच जाणे. माला तेणी घडयलीन खरी, पण आज में  आनंदात वावरत सताना बघेचे वेळा तो मात्र खूप दूर गेलो. परत कयीच न येणेचे वाटान! पण सयेल त्याहांथीन तो बघितच सनार. तेणी लायलेलां संस्काराचा झाड कितकां उंच गेलांसे!

जन्म न देताय तो माझो बाबा झालो. सुखदुःखात पाठीशी उभो न्हेवनी माला सुखाचे मार्गावर हाडनीं ठेयलीन. मामा ज्याहां सशील त्यांहां तुझे आत्मेला शांती मिळो. 🙏

# .. ल्हानपणाचो काळ सुखाचो

अल्लड अवखळ बालपण..

ल्हान वयात फक्त खेळेचां, खायवेचां, मजा करेची हेंच खबर ससे. ना कसली जबाबदारी ना कसली खंत. पयली ते चौथीपर्यंत जाले अभ्यास हो कितेला करेचो ससे, हेंय खबर नतलां. शाळांत जायवेचां, शिकयतील तेची खर्डेघाशी करेची अणि मजा करेची.  हेंतच चार वर्खां गेली. तेंतय कोणय बोललोच अभ्यासाला लागोनी झाले तेचो राग करेचो. परत तेचे पुढेंत जायवेचांच नाय कयीच. कारण ती व्यक्ती म्हणजे अभ्यासच विचारणार से, हें समीकरणच जणू कितां.

सो ...

पण तेतथिंनय चालत चालत गाडी पाचवी ते सातवी पर्यंत पावली अणि पुढां दहावीची धोकेची रेषा सुद्धा ओलांडली. दहावी पासचो शिक्को एकदाचो मिळयलो. तेडलाच्यो काही आठवणी / अनुभव अणि भविष्यकाळांत तेंची अनुभूती.

सांगेचा कितां ते आम्ही भुरगीं रविवार सलो की, माच्छीं उशीरां उठेचां, असां यवजुनी रात्री निदवत सलो, पण आमचो आण्णू आजोबा आमला निदवे देल जाले शपथ! सकाळींच साडेसहाचे आधी येवनीं उठवित सले अणि उठलों नाय जाले तेंची मोठमोठ्यान भाषणा सुरू होयवेचीं. म्हणजे थोडकेंत आमला आंथरूणा वेल्ल्यां उठे भाग पाडीत सले. राग येंत सलो तेडला तेंचो. म्हणत सलों की (मनात) आपले भुरगेंना उठवेचीं, आमला त्रास देवे किताला येसत? मोठेन बोलेची सोयच नतली तेडला. असां मोठेना बोललों झाले आमचे पाठीचीं सालपटां नक्कीच येनार सलीं. आपलां, परकां असो भेदभाव नतलोच ते काळांत. 'सगळां गावच एक घर' असांच माननीं ऱ्हेत सलीं सगळींच.....

असे वातावरणात गेलेलां ल्हानपण आज खूप प्रसंगांना सामोरां जायवे बळ देसे. सकाळीं उठेचे संस्कार घरात सलेच पण आजय हे वयात सुध्दा उठे उशीर झालो तरी आण्णू आजोबांची आठवण येसे. लोक्कोर उठलां की कामा पटापट मार्गी लागसत हें खरांच.

दुसरो एक अनुभव म्हणजे आमचे पांडुरंग भाऊ. ते सद्दानीं संध्याकाळां दिवे लागणीला मारूतीचे देवळांत येवनीं एका खांबा कडा पाट घेवनीं ध्यानाला बेसत सले. आम्ही भुरगीं ते वेळा देवळाशी खेळत सलों, पण ते कयीच आमचेवर रागावले नाय. ते शांत बेसोनी ऱ्हेत  सले. आमचो भुरगेंचो कितकोय बवाळ, कवकवाट सलो तरी! पण घराशी जाताना सदांच सांगत, खेळा तुम्ही, पण पाच मिनटां शांत बेसा देवळांत.

## .. ल्हानपणाचो काळ सुखाचो

पण तां वयच मुळी दुसरेंचे सांगणे कडा आयकला न आयकले सारखां करणेचां असां. आम्ही तां सोडनीं देवेचा अणि घरा पळपुजो ( पळ काढणे).

पण एतां कळसे ते देवळांत शांत किताला बेसत सले? खूप गरज ससे आयुष्य उभारणीसाठी. मन शांत नसेल झाले केंचांच काम योग्य तऱ्हान तडीला जात नाय. ही शिकवण भाऊंचे ते शांत बेसणेथिंन मिळली माला. अडचणीथिंन मार्ग काढणे साठी शांततेची खूप गरज ससे अणि ती देवाचे पुढेत लीनतेन बेसोनीच मिळसे. हें जेडला माझे समजुतीत अनुभवलां तेडला पयलो नमस्कार मनोमन भाऊनांच (पांडुरंगकाका) केलो. शांततान खूप वाटो सुलभ हसत हें में प्रत्यक्ष अनुभवलां. तसो भाऊंचो आदर मनात पयलेपाश्णी सलोच पण शांततेचे बाबतीत दिक्षा न घेता ते गुरूच. 🙏

आदर सगळेंचोच से. मोठीं सलेलेनीं तेडला हे नां ते प्रकारान खूप संस्कार दिलेनीं सत. तेडला तेचां महत्व कळत नतलां पण संसाराचे प्रत्येक पायऱ्यावर सगळेंनी दिलेले संस्कार उपयोगा आयले अणि में तेचो सदुपयोग करीत आज चालसां.

पितृतुल्य सलेले सगळेंची में ऋणी सां जेंचेनी माला घडयली, तेंना माझो नमस्कार.

**सौ. प्राची प्रमोद परांजपे (जैमिनी)**
कांदिवली, मुंबई.
फोन: ९९६९१४२५६९

# नाचणीचो केक



**साहित्य:** नासणेचां पीठ, खाजुर, खारीक पूड, बारीक रवो, दही, वेलची जायफळ पूड, मीठ.

**प्रमाण:** एक वाटी नासणेचां पीठ, दोन चमचे बारीक रवो, अर्धी/पाऊण वाटी दही, ६-७ खाजुर, अर्धी वाटी ऊन दुधात भिजोवनी, खारीक पूड , इवळां रुची पुरता मीठ, वेलची जायफळ पूड सयेल जाले घालेची, घातली नाय तरी चालसे.

**पयली तयारी:** खजूर १ तास दुधा बरोबर भिजवेचे, मोग वाटनी, एका डबेला भितरल्या कडाला तूप लावेचा. तेत वरती दिलेलां साहित्य घालनी


**कृती:** वरता दिलेलां साहित्य एकत्र करनी ४-५ तास (ferment) फुगत थेवेचां, जे आयदणात केक करणार तेला तूप लावनी थेवेचा.

मोग सगळां परत घोटनी तूप लायलेले आयदणात घालनी 180 डिग्री ४० ते ४५ मिनिटा बेक करनी घेवेचो, हो केक कुकरात किंवा न्हेल असे आयदणात खालती/तळाला रेव घालनी बी करू शकासा.

**तळटीप** - नासणे हो एक मिलेट धान्य प्रकार से. With Low glycemic index

**शीतल रानडे**
लंडन (फोन: +४४ ७५९३५८४६१५)

# पुस्तक परिचय “क्ष किरणें”




लेखक- हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. रिया पब्लिकेशन, कोल्हापूर. चुकीच्यो रुढी वरती सुधारली अणि वैज्ञानिक दृष्टिकोनात्थींन विचार मांडलेले लेख हे पुस्तकात सत.

हिंदूंचो अडाणीपणा अणि मुसलमानांचो, गाय: एक उपयुक्त पशु माता न्हुय-देवता तर नायच.

पोटावर सरपटत जायवेचो नवस-

देव पावे हवो म्हणी, तेला प्रसन्न करनी घेव्वे भक्त प्रयाग क्षेत्रा पाश्णी हरिव्दारापावत पोटावर सरपटत जायवेचो नवस बोलसे. माणसाला सरपटणारे किडे पेक्षा श्रेष्ठ अशी माणुसकी मिळे हवी म्हणी देवानं पाय दिले सत. आमची इच्छा पाय सौवनी सरपटत जानांर, अणि तेगडा युरोपात अठरा वर्षाच्यो चेडी अटलांटिक पार करनार, दुसरो म्हणसे में उत्तर ध्रुवाकडलो अज्ञात खंड सोदनी काढणार! तिसरो म्हणसे में महासागराचे तळाशी जावनी त्यांहाची माहिती, फोटो हाडीन, कोणी एक म्हणसे ज्यांहा श्वासोच्छ्वास घेणांही कठीण त्यांहा जावनी तां वातावरण त्यांहाचो आकाशस्तर विरल सौनी तेचे वरती उडे विमान सोडेचा, अशी युक्ती सोदेची महत्वाकांक्षा, जमीनीवर ती पायान चालणारे माणसाला पाखा लावुनी उंच उंच उडणारो, गरुडाला ही लाजयणारो, स्वर्गालागी भरारी घेणार अशी माणसांना देवदूत करनी सोडेची प्रतिज्ञा करणारो तरुण!

## .... पुस्तक परिचय “क्ष किरणें”

जर देव मनुष्याचो धातो, त्रातो, हितकर्तो सयेल झाले तेला प्राण्यातलो खूप लाडको माणूस, हो नर नारायणाचे श्रध्दान घेतलेल्या शपथाप्रमाण प्रतीक, तेला किडो झालेलो बघनी बरां दिसेल काय? तेचे भक्तांनी, भुरगेनी आकाशात भरारी घेतलेली बघनी कृत कृत्यता दिसेल?

हिंदूंनो आमचे राष्ट्रातल्यो खुळचट रुढी, व्रता गोरक्षण संस्था आज चालू सत. ते प्रामाणिक गोरक्षकाना तेचा सांगणा से की, धार्मिक भाकडपणा लोकांत न पसरता ती चळवळ सुस्पष्ट अणि प्रयोगक्षम सवयी. वैज्ञानिक पायो त्याचो सौनी जसां अमेरिकात से तसां भारतात सुध्दा हयवा, पण ओगीच एखादी गाय नायते बैल देव, देवी म्हणी गावागावात फिरवनी भीक मागणारेना एक दमडीसुध्दा देवं नये. ते बैलाला कामाला जुंपोनी, भीकमागे गोभक्ताला राष्ट्रासाठी कामाला घेववो.

तरी नोंद करेच हवी तां म्हणजे हिंदूंनी गोरक्षणाला दिलेला धार्मिक स्वरुप भाबडेपणाचा सयेल पण दुष्टपणा चां नाय. हिंदू किंवा अहिंदू नी धार्मिक गोद्वेष सोडनी आर्थिक दृष्टीन गोरक्षण हेच कर्तव्य माने हवां.

दूरध्वनी (टेलिफोन) सैतानाचो शोध से काय देवाचो ? मौलवी विचारसत.
ख्रिस्ती चां तेंचां, तेंचेनी सुध्दा तेचे विधी प्रमाणं तां यंत्र ‘पवित्र ‘करनी घेतला.
केंचेय धर्माचे माणसान ग्रंथ माणसांनी लिहिलेले म्हणी अभ्यास करेवो. विज्ञानाच्या कसोट्यांवर उतरले तां घेववां. मनुष्यहित साधणारा तां घेववां, टाकावू, अडाणी, बुध्दी शून्य, कालबाह्य तां नि:शंकपणान सोडेचा.

काही काळात ईश्वरान साहा दिवसांत जग रचलां अणि सातवे दिवसा रविवारा सुट्टी घेतली. म्हणी रविवार पवित्र. असलां कायच्या काय सिध्दांत म्हणी देवाचे नावावर हे मानला नाय झाले शाप परलोकात नरक! असला ज्ञान मानू नाका.
जाति धर्माचे नावान एकमेकांची तकली फोडसत.

हे पुस्तक प्रत्यक्ष वाचे हवा. निदान थोडे तरी ‘सावरकरांचे विचार ‘कळतील.
ब्राह्मण क्षत्रियाना, क्षत्रियांनी जाटाना, जाटानी अस्पृश्याना तेच सूत्रांनी छळले.
पशू देव म्हणी देवळात थेयलो म्हणी ते प्राण्याचो देव हयवेचो नाय पण देवळाचो गोठो मात्र हयेल! कार्य कारण अणि तेचे वरचे उपाय हे तर प्रत्येकान वाचे हवां.

## .... पुस्तक परिचय “क्ष किरणें”

रेकॉर्ड म्हणजे उच्चांक, हुतात्मो, जुळणारी, विश्वस्त, स्तंभ, अद्यावत, बोलपट, विधिमंडळ हे शब्द तेंचेनी मराठीला दिले सत. केंचोय शब्द कितकोय बोधक सलो तरी तो रुढ हयवे होवो, तेचे शिवाय तो कानाला अणि मनाला चपखल से असा दिसत नाय. कायदो हो तर समाजाचे अस्तित्वाचो पाया, तो तरी शब्द स्वकीय शब्द हवो काय नाय. ही भाषा शुध्दी मुद्दाम लक्ष देवनी वाचे हवी. रशियातलो घटस्फोट -स्वातंत्र्याचो प्रयोग.

स्त्री मासिक, फेब्रुवारी १९३६ तेंचो लेख , किर्लोस्कर मासिकातलो तेंचो लेख, ही भूतदया काय भूतबाधा ? आपल्या भाषात आपले शब्द  हे एक सुत्र लक्षात घेव्वे हवा. धर्म भोळेपणाचो कळस हे प्रकरणात  एखादी गोष्ट  लौकिक भाषांत न सांगता ती कशी भक्ति विजयी भाषांत अलौकिक करनी सांगे ची तेवरचा तेचा भाष्य आपले डोळेत झणझणीत अंजन घालेचा काम करसे असां म्हटलां झाले चूक हैवेचा नाय.

तिबेटांतली, किंवा तेचेवर केलेला संशोधन प्रत्येकान वाचे हवां.

**सौ. गायत्री श्रीपाद भुस्कुटे**
म्हापसा, गोवा.
फोन: ९४२२४५८३४०

# आमचो राखणो नकुळ



नकुळ पर्येकार हो आमचेकडा सुरवातीला राखणो म्हणी आईलो. तेचे आधी सिताराम, लक्ष्मण, नकुळाचो बापुय बोंबडो पर्येकार हे आमचेकडा ह्वेवे सले. हे सगळे हेदोडे गावात ह्वेणारे. खुप गरीब परिस्थिती, म्हणी ज्याहा मिळेल त्याहा काम करणारे.

राखणो म्हणजे गोरवाना सांभाळणारो. आमचेकडा तेडला म्हणजे १९६५-६७ साल सैल, २५-३० नग गोरवा सली. ७-८ गायी, पैकी ३-४ दुध देणार्यो अणि ३-४ गाभण, ७-८ बैल, वासरा, पाडे मिळोनि २५-३० सहज हत सली. गोरवा मुध्दाम बाळगीत कारण गायरीत शेण, मूत लागी करनी कुळागाराला घाले मिळे. गायीन्चा भरपूर दुध मिळे. घरात १५-२० लोक जेयनारो. तेचेत ७-८ भुर्गी म्हणजे दुध, दही, ताक कितका लागेल कल्पना येव शकसे. दुध तापवोनी थंड करनी दही लायला जात सला. हे सगळा दोन शिकेवर ठेयला जात सला. दर दोन दिवसांनी माझी आई (आज्जी ) सकाळी ११ चे दरमेन दही दोऱ्यान घुसलोनी ताक अणि लोणी काढला जात सला. लोणी वेगळा करनी आठवडेत एकदा लोणी कढवोनी साजूक तूप केला जात सला. मोग कईतरी रवेचे लाडू किंवा शिरो केलो जाय. ताक घुसलेणेचो आवाज खुप मजेशीर येत सलो. मे लागी सलो जाले आई हळूच माला बलावणी लोण्याचो गोळो माझे तोंडात घाली. शिवाय ताजा ताक प्येवे देत सली.

गाईन्ची नावा वैनी (आई ) ठेवीत सली. ति सली लक्ष्मी, तिकलू, मोगरा, गौरी, बाळी, जांभळू, शेवता, वैगेरे. वैनी तेंचेवर खुप माया करी म्हणी अगदी सहज ति दुध काढी. ताच मे गाईचे लागी गेलो झालें शिंगानी मारे येत सल्यो. सकाळी ६:३० पर्यंत दुध काढेचा. मोग शेण, मूत लागी करनी गायरीत नेवनी उडवेचा. वासरांना सोडनी परत दावणीला बांधेची असा काम चाले. गाईचे लागी एक लहान गवण सली तेत वासराना सोडेची. सामखी लहान वासरा घरात नायझाले पाठले पडवीत गवणीत सोडत. गाई अणि मोठी वासरा नकुळ तेना घेवनी दुर रानात जाय.

## .. आमचो रावणो नकुळ

तसाच बैलांची नावा सली चंद्रो, पदमो, पोवळो, काळू, धवळो, अशी सली. तीन जोता म्हणजे सहा बैल कायम लागत. आमचे लहानपणी रान बरेपैकी सला. जेडला जोताचा काम नसे, तेडला सगळयो गाई, बैल वासरा, पाडे सगळेना चरेला घेवनी जावेचा काम नकुळ करी. लहान वासरा घरा सत सली.

नकुळ सकाळी सात वराना  चहा, नाष्टा करनी तयार ह्वेत सलो. वैनी तेला दुपारचा जेवण २/३ भाकर्यो बरोबर तिखट चटणी लोणचा असा केळीचे पानात बांधनी देत सली. तो शिधो घेवनी अणि सगळे गोरवाना घेवनी दुर रानात जाय. दिवसभर गोरवा येथेच्छ चरत अणि संध्याकाळ झाली का परत येत.

नकुळाला पाऊस सुरु झालो का दोन कांबळी मिळत. एकाची खोळ करनी तो तकल्यावर घेय. खोळीत एक प्लास्टिक भरी कारण अति पावसान कांबळीत भितर पाणी येव नये म्हणी. दुसरी कांबळ पांघरे वापरी. पाऊस अति पडत सलो.

नकुळ जरी रावणो म्हणी आईलेलो तरी तो पडेल ती कामा करी. एकदा गोरवांची वहीवाट खबर झाली काय दिवसभर थांबेची गरज लागत नतली. गोरवा केंचे दिशान गेली सत ता लक्षात घेतला कि ठराविक वेळात गोरवा के सणार हे तेला खबर सत सला. करमळ्याचे दिशान गेली झालें वाळवटावर, धावेचे दिशान गेली झालें कोदाळ नायझालें बांबराकडा, सातोडेचे दिशान गेली झालें मोरतेम डोंगरावर, अशी ठीकाणा ठरलेली सली. गोरवाना बलावेची एक पद्धत सली एक विशिष्ट तर्हान कुकारे मारले का गोरवा हंबोरोनी दाद देत. एताचेसारखी काजीची रेना नतली. एता लोकांचे काजीत गेली झालें लोक तेना बडवोनी सोडसत तेला लागोनी गोरवा पाळणा एता शक्य नाय.

पाऊस सोपलो काय तो संध्याकाळा येताना आवळे घेवनी येत सलो. डिसेंबर, जानेवारी महिनेत आवाळे बरोबर चाफरा, चिंचो,कणेऱ्या असो रानमेवा घेवनी येत सलो. एप्रिल, मे महिनेत करवंदा, चूर्णा, अणि पाऊस सुरु झालो का भेडसा घेवनी येत सलो. मे कई कई तेचेबरोबर हे सगळा लागी करे जात सलो.

संध्याकाळा आम्हीं सगळी भुर्गी शुभंकरोति म्हणे बेसत सली. बरोबर थोडा स्तोत्रपठण हे घरचे फर्मानप्रमाण हत सला. वैनी, आई, दादा (बापुय ) एक दोन कांबेऱ्या अशी सगळी सुपारी सोलेचो कार्यक्रम चाले. दादा उठलो का नकुळ तेची जागा घेवनी साथ करी.

## .. आमचो राखणो नकुळ

मे प्रयत्न करनी बघलो पण हात तासलेशिवाय काय साध्य झाला नाय. खुपदा बोटा अणि हात सॅलटणी घेतलो. घराशेजारा १०० मिटरावर एक मोठे खळेत सुपारी सुकत घालीत, त्याहा लागी एक मोठी माटोळी घातली जाय. त्याहा आम्हीं कंदीलात अभ्यास करीत सले. माटोळ्यालागी एक मोठो परसो घातलो जाय कारण थंडी खुप पडे अणि कुलकुलो भरे. थोडे वेळान रात्रीचा जेवण करनी नकुळ त्याहा येत सलो. तो त्याहाच निदवत सलो. तो आईलो का खुप गजाली सांगे म्हणी तो येईपर्यंत मे थांबत सलो. तेच्यो गजालीत रामायण, शंखासूर, कौरव -पांडव, शिव, गणपती असे विषय येत सले. तो शिकलेलो नतलो तरी बरी जाण सलेलो सलो. तेच्यो गोष्ठी खुप रंगवोनी सांगे.

कई कई माझी फकाणा करी. मोग दोघेय खुप हसत सले. मे तेला विचारी नकुळ" तु दिसभर गोरवांच्या पाठल्यान आसता तुका वाज ये ना रे? तो सांगे कामाचो केन्नाच कंटाळो करपाचो न्हू." देव सगळे सांभाळून घेता. माझ्यावांगडा खुप राखणे आसता. एक दोन चेडवा म्हशी घेवोन येतात. आम्हीं खुप गजाली, फकाणा अणि मस्ती पुण करता. माला तेडला काय समजला नाय पण हि मस्ती कसली ता तेणीच एकदा सविस्तर सांगलान.

नकुळ सकाळी गोरबा घेवनी जाय अणि कई कई १०-१२ वाजेपर्यंत परत येत सलो. मोग इतर कामा कार्यो वई कर, पेंड लाय, पाडप सैल झालें नारळ, बेडे पुंजावनी हाड, शिपे चल अशी मिळेल ती कामा तो करी. संध्याकाळ झाली का गोरवाना बघे जाय. जास्त करनी गोरवा वाटाच मिळत. गोरवाना पण एक शिस्त ससे. तेंचा चरोनी पोट भरला का घराचो रस्तो धरसत.अणि मोग रवन्थ करे सुरु.दुभत्यो गाई लगेचच म्हणजे २/३ तासात दारात येवनी हाम्बरो लागत मोग वैनी तेना चार, पेंड घालनी बांधनी थेवी.

नकुळ  माझो एकदम आवडतो मित्र सलो. कारण तो माला खुप किता करनी देत सलो. वेळूची बासरी तो करी. कोंडेबेटीत जावनी पोकळी सलेलो कोंडो नायझाले वेळू हाडेचो. तेला स्क्रूड्राइवर नायझाले उलथना घेवनी चुलीत खुप वेळ तांबडा हयपर्यंत तापवेचा अणि ते कोंडेवर किंवा वेळुवर ७ भोखुरे करेचे. वरती एक मोठो भोखुरो. मोग वेल्ले भोकुरेपर्यंत मेण भरेचा, श्वास रोखणेकरता. बासरी तयार. मे खुप तर्हान सुर काढनी बघले पण बासरी काय फिदा झाली नाय. नकुळ खुप सुंदर वाजवी, श्वास रोखेची कला तेला ज्ञात सली. काही पदा, अभंग तो वाजवी " वारियाने कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले ", सुंदर ते ध्यान, किंवा विठ्ठल, विठ्ठल जय हरी विठ्ठल, कान्हा तुला रे, कृष्णा तुला रे " अशी गाणी तो वाजवी.

## .. आमचो राखणो नकुळ

अणिकय बर्योच वस्तु तो करनी देत सलो. कवातेच्यो पात्यो काढेच्यो. उभ्या पात्यावर आडव्यो पात्यो लावनी अगदी खालती गेळ्याचो काटो लावेचो. पेपारा तयार. पण हे पेपारा घरात वाजवे बंदी सली म्हणी कुरागाळात जावनी वाजवेचा. भेडसाचे पानाचा पेपारा हत सला पण एकदम लहान टिकाऊ न्हुय अणि आवाज समखोच लहान. अणि एक वस्तु म्हणजे फटाश. एक कोंडेची पोकळ काठी पुढा मात्शी निमूळती हणारी. दुसरी कोंडेचीच बारीक काठी खेचेसाठी. हे नळ्यात हसलण्या भरणी म्हणजे एक एक नल्यान नेटान खेचेची म्हणजे दुसऱ्या वाटान हसलण्या २५-३० मीटर जावनी पडे. मे हो प्रयोग पेटेवर(कुत्रा ) नायझाले मांजरावर करी म्हणजे ती शेपटी तुटेपर्यंत धावत सली.

ऑक्टोबर १५ ते साधारण दिवाळ्यापर्यंत सगळा भात कातरुनी खळेत गुडयो रचल्यो जात सल्यो. दिवाळी झाले नंतर खळा बरा सारवोनी मळणी घालेची तयारी हत सली. भात कातरुनी झाला का गोरवा अर्धो दिवस सरदात जात. कारण त्याहा भात अणि हिरवा गवत खुप मिळे. सगळे पावसात खुप चरोनी गोरवा बरी पुष्ठ हत सली. गाई मात्सो चरत पण पाडे अणि बैल मेरांची माती शिंगानी उडवीत अणि मोठ्यान ढेकर देवनी एकमेका बरोबर झुंज करीत. थोडे पाडे गाईंची कळ काढीत. ह्यो झुंजी बघे खुप मजा येत सली नकुळ मुध्दाम माला घेवनी जाय. आमचो चंद्रो कोणालाच ऐकत नतलो. हरणारो बैल शेपटी तुटेपर्यंत पळोनि जाय.

असो हो नकुळ, तेचा विस्मरण शक्यच नाय. तो अजूनय हेदोडे गावात हयात से. ७५ वय सैल. पोटपाठ एक झालासे. चार पांच भुर्गी. कितली भुर्गी म्हणी विचारलेवर “ तीन चेडवा अणि दोन झीलगे “ असा सांगलान. अजूनय पडेल ता काम करसे. हल्लीच मे तेला मिळोनि आईलो थोडी भेट दिली. तेणी रोकडीच ओळख दाखयलिन. तेणी केलेली माझी विचारपूस अणि गालावेल्ला हास्य मे विसरो शकत नाय. परिस्थिती कोणाला कशी मिळसे सांगता येत नाय.. पण जिवाशिवाची भेट एक आगळी वेगळी चिरंतन स्मरणात ठेयणारी.

**सुभाष जोशी**
पर्वरी, गोवा.
फोन: ७०२०६१८३२८

# प्रवास वर्णन



में अगदी ल्हान सताना म्हणजे सहा सात वर्खांची माला शिके पुणेत धाडलेली. तेचे उपरांत मे बरोच प्रवास केलो से. पण १०/१२ वर्खा पाठली गोष्ट. मे सांगल्या जाणार सल्यां माझे नंडांचे नातवाची मुंज सली. म्हणी में बशिन बेळगांवा जावनी पुढा रेल्वेन जायवेचा म्हणी बशिन जात सल्या. गोवा सिमा ओलांडली अणि थोडां पुढां गेलेवर कळला कि त्याहां एक मोठ्ठो ट्रक अडकलो से, अरे देवा!! एता कितां करेचां. सगळे दादले मंडळी खालती उतरोनी बघनी आयले इतकेत गाडी सुटेची नाय म्हणी सांगो लागले. सगळो रस्तो बंद झालो. दुचाकी, चारचाकी, ट्रक दोन्ही वाटान रांगो लागल्यो.

एता गाडी कय सुटणार? बशित बेसोनी बेजार आयलो पण करणार कीता? वाट बघले शिवाय दुसरो पर्याय नाय. कितां करु येवजत नतलां. त्यांहा 'नेटवर्क' मिळत नसले कारणांन मोबाईल बरोबर सौव्नी बी तेचो उपयोग हत नतलो. तहान लागली पाणी प्येवनी पाणी सोपला. भुकय लागलेली. आमचो एक बंधु तेणि भाकऱ्यो हाडल्योन सल्यो माला एक खायवे दिली. पोट मात्सा थंड जालां. पण पुढां चालत जाणार झालेवर वाट खुप सली. आमची अशी परिस्थिती जाली " ना घर  ना दार " इतकेत आमचो एक पत्रकार बंधु  कै. महादेव जोशी तेला केंथीनतरी कळला कि चोर्ला घाटात ट्रक बंद होवनी रस्तो बंद जालो से. तेडला तेचे तकल्यात विचार सुरू जाले. एतां कितां करेचा?

मात्र तेला कळतकत तो ऱ्हेलो नाय. त्याहां येवनी कितां झाला से तां बघनी पुढली हालचाल सुरु केलीन. तो पर्यंत दोन वरा जाली.  पाव्वे उशीर हणार आमची बेळगांव ची माणसा पुढां गेलेली, माला एकटीला जायवेचां  पडणार पण ओंगी ऱ्हेले शिवाय पर्याय नतलो.!!  बरीच भूक लागलेली, एका सद्गृहस्थानं गाजरा हाडलेली ती सगळे बसभर लोकांना दिलीन.

# प्रवास वर्णन

मोग तां सगळां बघनी कै. महादेव परतो गोवेत आयलो अणि तेणी क्रेन धाडनी दिलीन! मोग काम सुरू जाला. फोन लागत नाय! पाणी नाय ! खूप त्रास जालो. पण करणार कीतां? असा करीत एकदाची वाट मोकळी जाली. हुश्श जाला.!! इतका हसे म्हणे पर्यंत पाच वरा जाली. एता पुढां कीतां करेचा? बस सुटली! बेळगांव स्टेशन वर गेल्या त्यांहा गर्दी ! कसाबसा तिकिट काढला अणि एकदा रेल्वेत अक्षरशः घुसल्या. बेसे जागो नाय तितकेत एक चाय वालो आयलो. तेचेकडथीत एक चहा घेतलो. तितकेंत फोन सुरु जालो. गाड्यात इतकी गर्दी! फोन काढे मिळत नाय. चौकशीचे फोन येंव लागले आई तु कुठे आहे? वहीनी तुम्ही कुठे आहात? काय झाले? मग एकदा फोन करणारेंना सांगला." में येसां गाड्यांत सां उशीर हणार! "

असो हो माझो प्रवास जालो करता करता कार्यालयात जाईपर्यंत मला रात्रीचे अकरा वाजले वाट बघनी बघनी लोक जेवनी निदवे गेले. में हातपाय धुवोनि भात सांबारा जेयल्या. अणि मोग एकदाची निदल्या जावनी. असो हो प्रवास अगदी लक्षात ऱ्हेलो. काराय प्रवासात जाताना पाणी अणि घरातला कीतांतरी घेवनीं जायवेचा!.

**अश्विनी फाटक**
सालेली, गोवा.
फोन: ९७६४३१९३४६

# गोंधळ सगळो

जालो गोंधळ पुरे एतां, एतां तरी जगोया नीट ।
तांच तांच बधनी सगळां आयलोसे वीट ।।

तेच हेवे, तेच दावे, फुकटच्यो बढायो ।
उगीच आपलो मोठेपणा, आपल्योच गासत ओव्यो ।।

बारिक बारिक विषयावर किताला दुश्मनी ।
उच्च, नीच भेदभाव धरोच नये मनी ।।

ताच पाणी, तीच माती, तीच हवा सगळेकडा ।
सगळेजण एक हौवनी, सगळेंच्या उपयोगी पडा ।।

काय दिवसाचे आमी प्रवासी, किताला उगीच झोक ।
सगळेनाच जायवेचा, जरी आयलो एक एक ।।

एता तरी  ऱ्हेवया, सगळेंचो करनी एकवट ।
तिच तिच लढाई बघनी, नीज येत नाय एतां ।।

में में  म्हणणारे सुद्धा कोणच ऱ्हेले नाय ।
ओगीच बढायो  मारनी ओढले  दुसरेचे पाय ।।

कसली ही सुधारणा, जगो येत नाय नीट ।
म्हणीच म्हणसां बधनी हे सगळेचो आयलोसे वीट ।।

**रामकृष्ण दिनकर सोमण**
गोवा.
फोन: ९४२३८८३८४३

# ऐतिहासिक व्यक्ती "आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य"



चाणक्य ही व्यक्तिरेखा माला नक्की कय कळली तां काय यवजत नाय. शाळांत सतांना आईकलां सयेल पण, तेडला असे व्यक्तिमत्वांचा महत्त्व कळेचा वय नस्से. में एक चाणक्य वर दोन मालिका बघितल्यो एक दूरदर्शनवर अणि हाल्लीसराला अणि एका चॅनलवर. दूरदर्शन वेल्ली जी मालिका में बघितली तेतलो नट माझे मनातलो "चाणक्य" दाखयणारो सलो, दुसरी मालिका ही मात्शी वेगळ्या तऱ्हान ल्हियलेली सली, इतर महत्वाची पात्रां भडक रंगेयलेली, म्हणी बहुतेक आवडलेली नसेवी. तेतला नेपथ्य, धाकटो चंद्रगुप्त बरो सलो.

कोवीड काळांत दूरदर्शनवर जुन्यो मालिका, रामायण, महाभारत परत दाखव्वे सुरुवात केली तेचबरोबर चाणक्य ही मालिकाय बी सुरु झाली आणि में ती बघणेत मग्न होवनी गेल्या.

चाणक्य हो भट ! ते मुळां अफाट बुद्धीमत्ता ही निसर्गदत्त मिळ्ळेली. पण तेची स्वत:ची अशी नीती सली, जी पुढां जावनी चाणक्य नीती म्हणी वाखाणली गेली, तसांच कौटिल्यचा अर्थशास्त्र सुध्दा. "आर्य चाणक्याचा" जेला- कौटिल्य सुध्दा म्हणसत तेचा व्यक्तीत्व सम्राट चंद्रगुप्ताशी जोडलेला से. धनानंद हे आपले अतिशय दुष्ट असे राजाचा साम्राज्य उखडणी/खणोनी उडव्वेचो प्रण तेनी केलेलो, तो म्हणसे “में माजे शेंड्याची गाठ तोपर्यंत बांधेचो नाय, जो पर्यंत में हे क्रूर राजाचा राज्य उलथवनी लावेचो नाय.”

चाणक्याची सगळीच काणी हे एका धागे भोवतालीन फिरसे.

# ऐतिहासिक व्यक्ती "आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य"

हेचेत तेची जी निश्चयी वृत्ती से तीच मनाचो ठाव घेसे. ते काळातले भट सुद्धा शस्त्रनिपुण सले आणि ते क्षत्रियांना युद्धविद्या शिकवीत ही गोष्ट नमूद करणे सारखी. आपली प्रतिज्ञा पूर्ण करणेसाठी चाणाक्यांन् एका ल्हान पण शौर्याची चुणूक जे भुरगेत दिसली असो एक भुरगो हेरनी थेयलो. तेला राजा करेसाठी जां कितां कौशल्य अणि रणनीती शिकवेची गरज सली, तेचेत्थीन निती शास्त्र तयार जाला. तेला जे धडे दिले ते सगळे राज्यशास्त्रातले उत्तम असेच धडे मानसत. हे धडेच पुढां जावनी सध्याचे काळात मॅनेजमेंटचे आणि राज्यशास्त्राचे सर्वोत्तम धडे म्हणी शिकयसत.

चाणक्य नीती (Chanakya Niti) आपले आयुष्यातले प्रत्येक घटनांवर मत देसे. केंचाय नातां सोवदे, नायले जीवनाचो खूप असो महत्त्वाचो पैलू चाणक्य नीती सदांच आपलेला मार्गदर्शन करसे; सतर्क करसे. असां म्हणसत की, जे लोक आर्य चाणक्य हेंचे विचार जीवनात पाळसत तेनां आयुष्यात नक्कीच यश मिळसे. इतकांच न्हूय तर देवी लक्ष्मीचीही तेंचेवर सदैव कृपा हसे.

जेडला चंद्रगुप्तांन धनानंदाचो पाडाव करनी राज्य जिकला, ते दरमेन् अणि मॉग पुढलो राज्य कारभार करतांना चंद्रगुप्त राजाला सतत मार्गदर्शनाची सलेली गरज चाणक्यान् पुरी केलीन्. में जी मालिका बघितली त्यांत हे कूटनीतीचे धडे दिग्दर्शकांन् व्यवस्थित मांडले सले मुळां बरे कळ्ळे. कौटील्याचा अर्थशास्त्र सुध्दा आजचे जगांत प्रमाण मानसत. ही मालिका खरां जाले एका वेगळेच विश्वात न्हेणारी. अणि दुसरा एक म्हंजे सूर्य स्तोत्रांतले जे श्लोक शिर्षक गीत म्हणी वापरला सला ता सुद्धा खूप मन मोहक सलां.

में चाणक्य कळेवो म्हणी तेचा निती शास्त्राचा एक पुस्तक वाचला, तेंत बायलां बद्दलचे काय काय उल्लेख माला निश्चितच खटकले. पण ते उल्लेख, कदाचित ते काळानुरूप बरोबर सतील सुद्धा. कारण चंद्रगुप्त मौर्य हे पयले सम्राटाचा राज्य मुळांतच इ. स. पूर्व ३२१ इतके प्राचीन काळातला. तेमुळां तेडलाच्या गजालींची कशी कल्पना करता येल? चाणक्याचा व्यक्तिमत्व मात् लेखक कसो लिहील किंवा पटकथा कशी ल्हियली सयेल ते प्रमाणच हसे. म्हणी लेखक बी तेच ताकतीचो हवो, नायजाले चाणक्य सपक तरी हयेल नायजाले ओगीचच अनैसर्गीक तरी दिसेल. हे पुढले काळांत सुद्धा हे विषयावर साहित्य तयार हणार हे नक्कीच, ही एक उत्तम असे पुरुषाची व्यक्तिरेखा से.

# ऐतिहासिक व्यक्ती "आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य"

"छत्रपती शिवाजी महाराजांचो" लौकिक असोच मोठो. पण ते चाणक्याचे काळाचे मानान् खूपच हालीचे काळांतले म्हणे हवे. हे दोन साम्राज्यांचे मध्यां, अशोक, गुप्त असे बरेच राजे होवनी गेले. पण मधलो काळ हो भारतासाठी अगदीच वाईट गेलेलो. कारण मुघल, इंग्रज हेंचे काळांत चाणक्य सारखां व्यक्तिमत्व झाला नांय. भारताला स्वातंत्र्य मिळ्ळा तरी एतांचे राजकारणी नेते बघता, परत पुढलो चाणक्य कय जन्म घेल कोण जाणे.

आर्य चाणक्य हेंनी आपलेला, आयुष्यातले संकटांत्थीन तडीपार हणेसाठी नीतीशास्त्रात काय महत्त्वाचे विचार सांगितले सत. हे विचारांचां पालन केला जाले मनुष्याला जीवनात येणारे संकाटांना न भ्येतां धिरान् सामोरां जावनी एक बरां आयुष्य जगता येल. तेतल्योच दोन तीन गोष्टी खालती ल्हियल्यो सत

- **पिसे मित्रापेक्षा, हुशार शत्रू बरो**
- **समस्या सगळेनांच येसत, पण तेंना धीरान् सामोरां जायवे हवां**
- **आपली गुपीतां कोणाला कयीच सांगो नाका, असां केलांत जाले तुमची लुकसानी हयेल**

"चाणक्याच्यो निती शास्त्रातल्यो गजाली जर भुरगे पणातच वाचल्यो, अणि तेंचेनी समजोनी घेतल्यो जाले तेचो आयुष्य जगे खूप उपयोग हयेल.

**सौ. देवश्री गोडबोले**
कोथरूड, पुणे.
फोन: ९०११९५८७२५

# माजी ई. पयलीची सहल



होय तुमी बरोबर  वाचलांत.
आमची इ. पयलीची सहल साईबाबा मंदिर टेमघरपाडा कल्याण - भिवंडी रोड  एठां   गेलेली.
आम्ला त्याहाचे पुजाऱ्यांन सांगितला की एका भक्तासाठी बाबा एठा आयलेले.
त्यांह आमी खूप मजा केली. झोपाळो, घसरगुंडी, शीसॉ असे खेळ खेळलो. मोग बाईंनी आमचेकडल्या उजळणी, स्तोत्र म्हणोनी घेतला. मैदानी खेळ, बैठे खेळ खेळणेसाठी प्रोत्साहन दिलां. मोग आमी सगळेंनी आपापले अणि शिक्षक, शिपाई मामा, मावश्यो हेंचे डबे एकीकडा करनी वनभोजनाचो आस्वाद घेतलो. संध्याकाळां नवे उमेदीन अणि आठवणी मनात साठवोनी घरा पावलो.
एठा तुमी म्हणाल की ह्याला इयत्ता पयलीची सहल कशी लक्षात ऱ्हेली ? पण खरांच ते निरागस वयात आम्ला आमचे शिक्षक, शिपाई मामा, मावश्यो  कौतुकान सगळां समजावनी सांगत सले, आमचे सगळें हट्ट अणि लाड आवय अणि बाबासारखे पुरवीत. ते हे जन्मात तरी विसरणां शक्य नाय. असे शिक्षक अणि शिपाई मामा, मावश्यो, खूप क्वचित मिळसत. आज माजां  मन हे सहलीचे वर्णनान अगदी भरोनीं आयलांसे. ल्हानपणायल्यो आठवणी ताज्यो जाल्यो. हे निमित्तान माला ल्हानपणाच्या आठवणीत वेळ घालवे मिळ्ळो.. . ❤️❤️❤️❤️😊😊😊😊

**सौ. वर्षा केळकर**
बदलापूर

# बालपण दे गा देवा



कितकां निरागस ससे न्हुय बालपण!
एक एक आठवणी मजेशीर सतत. काल माजी चेड अणि में गजाली मारीत मारीत पोंहू करीत सलों, तेडला में माझे ल्हानपणातली एक मजेशीर गजाल त्याला सांगली. तीच तुमला सांगसा.
में सहावीत काय सातवीत सतानांची ही गजाल.
आई भायरची सली अणि माला पहू करेचे सले. आईला विचारला कसे करेचे ? त्यांनी सांगलान पहू चाळणीत धोवनीं घे अणि मोग मिरची, करवील ( कडीपत्तो ) घालनीं फोडणी घाल. "ऊसळो (डाळ तांदळाची खिचडी ) करसों तसो. जालां! तो ऊसळो करसों तसो हो विषय पक्को म्हटलो अणि आईला सांगितला " एता तू कायच सांगो नाकां, माजे माला करेचे सत.
ते प्रमाणं में बरे पहू बिहू धोव्नी घेयले. मिरसांगो चिरनी घेतल्यो. नारळ कातलो. बरो हिंग, सासवां, करविलाची फोडणी करनीं तेंत पहू घायले ............अणि..........................
ऊसळेसारकां दुप्पट पाणि घालनी शीजे ठेयले....जालां....
धाएक मिन्टानी आईन विचारलां अगो, पहु कें पावले ? में सांगितला अगे न्हे मात्शी, शिजसत. पाणी आटे हवां. सगळो प्रकार लक्षात आयलेवर आईनं कपाळावर हात मारलो. पण में केलेले पहू म्हणी आईबाबान प्रेमानं खाल्ले.

**सौ. विदुला विनय ताम्हनकर**
मालवण
फोन: ९८६०२२१३७६

# मकर संक्रांत

सगळेंना मकर संक्रांतीच्यो शुभेच्छा. 🙏
संक्रांत म्हणीं कितां? सूर्य एका राशीथींन दुसरे राशीत जाणां म्हणजे संक्रांत. एकूण बारा राशी सत... सूर्य हो बारा राशीथींन प्रवास करनीं परत पयले राशीत येव्वे ३६५ दिवस लागसत. साधारण ३०.५ दिवस एके राशीतलो प्रवास... हें सौर सायन (ट्रॉपिकल) वरखाचां माप से. म्हणी इंग्लिश ग्रेगोरियन कॅलेंडराचे तारखाशी मेळ बस्से. (तां बी सौर सायन/ सोलर ट्रॉपिकल से).

साधारणतः दर म्हयनेत एक संक्रमण हसे. अणि म्हयनो म्हणी कितां? अमावस्या ते अमावस्या हो कालावधी.. हो कालावधी भारतीय कालगणनेप्रमाण सगळां चंद्राशी संबंधित से. अमावस्या ते अमावस्या हो प्रवास चंद्र २९ १/२ सौर दिवसांत पूर्ण करसे (तिथी मात्र पूर्ण ३० सत, तिथी ची गणना वेगळी से) पौर्णिमेला जे नक्षत्रांत सूर्य दिस्से, ते प्रमाण म्हयनेचा नाव.. सूर्य पौर्णिमेला चित्रा नक्षत्रात तो म्हयनो चैत्र, पौर्णिमा मघा नक्षत्रात सली जाले तो माघ म्हयनो.. पण नक्षत्रां मात्र २७ सत.. २ १/४ (सव्वा दोन नक्षत्रां मिळोनीं एक रास हसे.

एतां चांद्र मासाचो कालावधी २९.५ दिवसांचो, अणि सूर्याचां संक्रमण मात्र दर ३०.५ दिवसांनी हसे... जाले केड्ला असो चांद्र मास येसे जेचेंत सूर्य संक्रमण नससे. हो मास आमी धरीत नाय ते तो म्हयनो पुढले म्हयनेचो 'अधिक मास' धरसत. एतां हो एक सौर मास अणि एक चांद्र मास हेंचेत एक सौर दिवसाचो फरक साधरणपणे ३० चांद्र मासांनी स्पष्ट हसे म्हणीं ते मासात सौर संक्रमण हत नाय, तेमुळां अधिक मास ३०-३२ म्हयन्यान येसत. (२९.५ x १२ = ३५४ चांद्र वर्ख, ३६५-३५४ =११ सौर वर्ख चांद्र वरखा पेक्षा ११ सौर दिवसांनी मोठां से म्हणी, ११ * ३०.५/ २९.५ ~~ ११.५ तिथीन मोठां सें)
असे तऱ्हांन अधिक म्हयनो हो चांद्र मास अणि सौर वर्ख हेंची सांगड. हें सामका ढोबळ मानान सांगणां जालां... पण सायन - निरयन हे विषयिकडा मात्र दुर्लक्ष जालां.
तरीय संक्रांती निमित्तान 'चडीत म्हयनें विषयी' तोडक्या - मोडक्या चित्पावनीत लिव्हेचां समाधान, उत्तरायणांचे अयना बरोबर कमी अधिक चित्पावनी लिव्हे सुरुवात केली से. 🙏
अणि १२ संक्रांतीत मकर संक्रांतच किताला महत्वाची, जाले मकर रास दक्षिणेची रास.. एठाथींन सूर्याचो पुढलो प्रवास उत्तरेकडा...

**दूर्वा दामले** - डोंबिवली
फोन: ७७३८५६९३१६

# नातवंडानी  भरलेला गोकुळ



नातवंडा म्हणजे उमलत्यो कळ्यो सत;
आजी आजोबांना सांभाळणारी फळी से,

नातवंडा म्हणजे मऊ मेवो,
आजी आजोबांचो गोड खवो,

खट्याळ जरी सयेल,
तरी आजी आजोबांना चालेल.

आबा करी घोडो घोडो पाठीवरती घेसे
मध्या मध्या आऊस
ओखद पाजी कडू,
आजी देसे गोड लाडू.

नातवंड म्हणजे गोड गुलकंद,
आजी आजोबांना नातवंडांना खेळवेचो छंद.

नातवंड म्हणजे खवेचो पेढो,
आजी आजोबां खूप आनंद घेवो,

नातवंड म्हणजे त्रिवेणी संगम तिसरे पिढीचो सयेल उगम.
नातवंड म्हणजे मायेची धार, आजी आजोबांचो म्हातारपणीचा आधार.

**श्रीमती. रमा गोविंद जोशी**
वास्को, गोवा.
फोन: ७५०७१५८४०३

# माझी सहल




तरुण वयात सायकलिंग करेची खूप हौस सली. ल्हान मोठ्यो खूप सहली झालेल्यो. पण एकदा तीन-चार दिवसांची सायकल ट्रीप करेचा ठरयला.. साधारण १९८४ साल, डिसेंबर महिनो, मोग ठरलां दापोली हरिहरेश्वर श्रीवर्धन दिवेआगर अशी सहल करेची. आम्ही पाच जण मित्र सलो.

पयले दिवसां हरिहरेश्वरला संध्याकाळा पावलो. वाटांत थोडी विश्रांती घेतली. येताना हाडलेले पोळी भाजीचे डबे सोपयले. तेडला 'रस्तेवर' एतां सारखी हॉटेलां नतली., संध्याकाळां हरिहरेश्वरला एका मित्राचे नातेवाईकाकडा मुक्काम केलो. दिवसभर खूप मज्जा आयली. तेडलाचे रस्ते , डोंगर दर्या, निसर्ग बघित बघित प्रवास झालो. पण वेसवी बंदरात हरिहरेश्वरला होड्याथिंन सायकली घेवनीं जायवेचो अनुभव बरो सलो. आमचेकडा पैसेय मर्यादित सले. पण नशीब बरां सला., तो दिवस बोट सेवा मालकाचे मातोश्रींचे स्मृति प्रित्यर्थ फुकट सली . आमलां कितको आनंद झालो,.

दुसरे दिवसा हरिहरेश्वर ते श्रीवर्धन प्रवास केलो. समुद्राचे काठाकाठानं अत्यंत रमणीय सागर किनारेचा दर्शन झाला. बरेचकडा अगदी समुद्राचे लागिथिन जाणारो रस्तो , जोराचां वारां केडला आडयणारां तर केडला गती देणारां.

## ... माझी सहल

एतां आमी पेशवेंचे गावात पावलेलो, बाजीराव पेशवेंची समाधी बघितली, माड पोपळीचे कुळागरानी भरलेलां श्रीवर्धन खूपच सुंदर दिसलां, पेशवे आळीत माजे आतेकडां दुपारचा जेवण केला अणि थोडी विश्रांती घेतली. संध्याकाळा तसेच पुढां दिवेआगरला गेलो. तेड्ला भांगराचो (सोन्याचा) गणपती नतलो, हे गाव समुद्राचे काठावर अणि निसर्गरम्य से. दिवेआगरला विश्रांतीसाठी माझे मित्राचे भेणीशीकडा ह्हेलो. एतां पाय बोलो लागलेले.. मोग खूप कारे फिरलो नाय.

पुढलो दिवस समुद्रावर फिरणां अणि मित्राचे भेणीशीकडा. तेंची बाग , कुळागर बघनी त्यांहाच ऱ्हेलो.

एतां परतीचो प्रवास मात्र, सकाळी साडेपाचला सुरू केलो. येताना आंबेत मार्गे नवीन पुलावेल्या परत आयलो. जस जशी दापोल्या लागी पावत आयलो. तेड्लामात केडलां एकदा घरा पावसा असां झालेला!. सलग दहा तास सायकलिंग करनीं अखेर संध्याकाळा दापोलीत पावलो.

हे प्रवासाच्या रम्य आठवणींत पुढले खूप दिवस रमलेलो. तेड्ला खर्चाचो बी हिशोब में लिहिलेलो, ती डायरी में अजूनी जपोनी थेयली से.

**नरेश दामले**
पुणे
फोन: ८८०६६६८७०९

# माजी फजिती

वीस वर्सां पयली, आमी हैदराबादला सहलीला गेलों सलों. तेड्ला घडलेलो हो प्रसंग. रामोजी फिल्म स्टुडिओमध्यां, सिनेमाचा शूटिंग कसां करसत, तां दाखयसत. तेंसाठी जेंना भूमिका करेची सयेल, तेंनी मेकअप रूममध्यां या. असा सांगला सलां. माला नाटकात काम करेची भारी हौस म्हणी में अणि पाच / साहा जणां, भितर गेलों.

मोग डायरेक्टरान सगळेंना शोले सिनेमाचे डायलॉग वाचे दिले. में विचार करीत सल्यां की माला केंचो रोल देनार? हेमा मालिनीचो रोल शक्य नाय, हेची माला खबर सली. पण कितांतरी बारीकसो रोल गावेल असा माला दिसला.

थोडे वेळांन डायरेक्टरान, दुसरे एका ताईला, हेमा मालिनीचो रोल करे सांगला. पडदेवर घोडेगाडीचा चाक फिरसे तांच फक्त दिसत ससे. डायरेक्टरानं माला म्हटलां, ' एता तू हे हॅन्डल फिरय म्हणजे, पडदेवर चाक फिरताना दिसनार.' माला इतको राग आयलो, में म्हटलां, 'माला भूमिका सयेल जाले द्या, में काय हॅन्डल फिरवे आयल्यां नाय एठा.' Sorry असां म्हटला नी में रोकडीच भायेर येवनी प्रेक्षकांमध्या जावनी बेसल्यां.

अशी माजे शुटिंगची गोष्ट सगळेना हसयसे.

**सौ. मिनल नेने**
पुणे
फोन: ८८०५९१३६०४

# पाचक आलां - लिंबू लोणचां



**कृती-:**

२५ लिंबू, पाव किलो आला, पाव किलो ओली हळद, जाडां मीठ, सासवां, हिंग, मेथी, मीरी ओली मिळली जाले; नाय झाले सूकीमीरी. अंदाजे, १० लिंबाचो रस.

१५ लिंबाच्यो बारीक फोडी करा, आलां, ओली हळद धुवनी पुसोनी किशण्यावर किसोनी घेवेची, मीरीं हींग, सासवां, मेथी, भरभरीत वाटनी घेवेचां. हिरवां .(भाजेचां नाय) सगळांएकठाय करेचा , वरथीन दाहा लिंबाचो रस घालेचो.

सुकी लाकडीपळी घेवनीं लोणचां कालवेचां.
मोठ्या काचेच्या बरणीत भरनीं वरती एक गुंडो (दगड ) ठेवेचो. बरण्याला एक मोठो स्वच्छ दादरो बांधेचो.

न्हावनी धोवनी स्वच्छता बाळगोनी दोन दिवसांनी ढवळूनी काढा अणि खावनी बघा!
मीठ कमी से आंबट लागसे जालेवर थोडी साखर मीठ घालनी ढवळा.

तुम्ही लोणचा करा खावनी बघा रूची घ्या अणि माला सांगा.

**श्रीमती. रमा गोविंद जोशी**
वास्को, गोवा.
फोन: ७५०७१५८४०३

# मेट्रो सफर



मुंबय, नागपूर पाठोपाठ पुणे एठा बी मेट्रोचां जाळां पसरताना दिसो लागलां से. मेट्रो मार्गाचां काम दिवस रात्र चालू सलां. एतां कांय मार्गाच्यो चाचण्यो बी पूर्ण झाल्यो सत. पुणे मेट्रो नागरिकांच्या सेवेत दिमाखान उतरली सें. काही मार्गांचां काम अजूनय बी चालू से. सध्या नवे मार्गाचां उद्घाटन बी झालां सलां. पिंपरी- चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट. ही हे पैकीच एक सें. हे मार्गातलां, सिव्हिल कोर्ट पाष्णी स्वारगेटचा अंतर भुयारी मार्गानं केलां सलां. तेमुळां मध्यां आयलेली स्टेशनां अंडरग्राऊंड सत. पाठले वर्खा, २०२३ मध्यां दोन मार्ग सुरू झाले सत. नागरिकांचो बरो प्रतिसाद बी मिळो लागलो असां दिस्से. एठा लोक म्हणसत, हिंजेवाडी आय.टी पार्काकडा जाणारो मार्ग सुरू हयेल जाले ट्रेफिकचो प्रश्न मार्गी लागेल. ह्यो अशो सगळ्यो बातम्यो आमी टी.व्ही.वर अणि वृत्तपत्रात्थीन आइकल्यो अणि वाचल्यो सल्यो. पण प्रत्यक्षात मेट्रो सफर करणेचो योग काय आयलो नतलो.

बरेच दिवसापाष्णी आमचो सगळेंचोच मेट्रो प्रवास करेचीइच्छा सली. अचानक एकदिवस घोवान फतवो काढलोन, उद्या सगळी मिळोनी मेट्रोत्थीन भोव्वे जावया. मोग कितां, कें जाय्वेचां, कितां करेचां असां सगळां कितां तां ठरलां. धाकटे बोड्योन तर आपलो गृहपाठ बी आधीच सोपयलोन.

आदितवार सुट्याचो दिवस सले कारणांन शाळा, ऑफिसाची घाई नतली. सकाळची कामा, जेवणां, खांणां लोक्कोर उरकली. जायवेची तयारी केली. बरोबर थोडां खायवे, प्येव्वे पाणी, उन्हाची टोपी असां सगळां घेवनी आमी सुटलो. पीसीएमसी ते स्वारगेट हे मार्गान जाय्वेचां म्हणी आमी घरात्थींन सुटलो. स्टेशनात पावतकच तिकीटां घेतली अणि फलाटावर उभे ऱ्हेलो. बरी गर्दी सली म्हणी, एक गाडी सोडली. तिसरे मिनिटांत अणीक एक गाडी हजर.

# मेट्रो सफर

आमी त्या गाड्यात चढलो. आदितवार सलेमुळां ल्हान भुर्गेंबरोबर मोठेची बी मेट्रो राईडसाठी गर्दी सली, असां माला दिसलां. हेत सिव्हिल कोर्टा पाष्णी स्वारगेट पावेतो सगळो भुयारी मार्ग सें. फुले मंडई स्टेशन बी जमिनी खालती सें . मंडई म्हटला की, डोळेपुढां येसे ती गर्दी. पण एठा स्टेशनावर कायएक गर्दी जाणवत नाय. पुढां स्वारगेट स्टेशनला आमी उतरलो. भुयारी मार्ग सलेमुळां दोन मजले वरती चढोनी आयलो.

बाहेर आयलेवर ठरलेप्रमाणे आमी लागीच सलेले सहकारनगर मधले 'सेवन वंडर' पार्कात पावलो. एठा जगातले सात आश्चर्याच्यो प्रतिकृती केलेल्यो सत. माहिती बी बरयलेली से. त्याहाथीन पुढां सारसबाग बी सें. बागातलां गणपती मंदिर प्रसिद्ध सें. एठाबी गर्दी सली. वाटात फुलवाले, बोमाडे, खेळणीं विक्रेते, भेळवाले असे खूप माणसांची  गर्दी सली. गर्द्यात्थींन वाट काढीत आमी देवळांत पावलो. बाप्पाचां बरां दर्शन घेतलां.

बारीक भुर्गेना पुरे झालेला म्हणी आमी खायवे कडाच्या खाऊ गल्लीत ह्वेलो. एठा पोटभर खाव्नी परत स्वारगेट कडां स्वार झालो . पोटपूजा झाले मुळां आमी चालतच सुटलो.
तिकीट काढलां अणि परत पीसीएमसी स्टेशन कडां मेट्रोन जायवे गेलो. स्वारगेट पाष्णी पीसीएमसी स्टेशन अंतर अवघे ३० मिनिटांत पूर्ण झालां. एरवी रस्तेन १ ते १ १/२ तास लागसे.

शेवटचां स्टेशन आयलां. लोकोपायलट जवळचो डबो सलेमुळां तेचां बी दर्शन घडलां. लोकोपायलटचो निरोप घेतलो. शेवटचां स्टेशन सलेमुळां मेट्रो त्याहांच थांबली सली.  तेचो फायदो घेत आमी सेल्फी घेतली अणि मेट्रो सफर पूर्ण केली. स्टेशनात्थीन बाहेर आयलो अणि प्रवासातल्यो सुंदर आठवणी घेव्नी घरा पावलो.

**सौ. दीप्ती दामले**
पुणे
फोन: ८००७७७०७४६

# भोजपुर - एक प्रेक्षणीय स्थळ



माळवा प्रांतातलां प्रेक्षणीय स्थळ माला बगेचां सलां. काल में भोपाळचे दक्षिणाला भोजपुर एठा गेलो सलों. भोजपुर एठा सलेलां भोजेश्वराचा देऊळ १००० वर्ख जुना सें. मालव्याचो सुविख्यात राजा, राजा भोज परमार हेचे कार्यकाळात देवळाचा निर्माणकार्य सुरू जाला. एतांपर्यंत अज्ञात सले कारणांन हे देवळाचा बांधकाम हयवेचां उरलां. तां आज बी अपूर्ण से. देवळाला कळस नाय.

जे गजालीसाठी हें देऊळ प्रसिध्द सें ती गोष्ट म्हणजे एठा सलेलां महाकाय शिवलिंग. केवळ लिंग साडेसात फुट उंचीचां सें. योनिपीठ मोजे घेतला जाले जमिनीपाष्णी २२ फुट उंची सें. दुसऱ्या केंचेच देवळाचां इतकां भव्य दर्शन में घेतलेला नाय.

**अक्षज जोशी**
नागपूर
फोन: ९०११९३९६४४

● ● ●

## गणपुले फाऊंडेशन ची उद्दिष्टे

- आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या न्याती बांधवांना शिक्षणासाठी मदत.
- भारतीय संस्कृतीचे जतन करणे.
- वेद आणि संस्कृत भाषेसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मदत.
- शाळांमध्ये संस्कृत भाषेचा प्रसार.
- करिअर व नोकरी साठी आर्थिक दृष्ट्या असक्षम न्याती बांधवांना मदत.
- चित्पावन यूथ फोरम
- चित्पावनी भाषेचा प्रसार.
- नवीन पिढी साठी संस्कार वर्ग.

# माहेर घर

माझां माहेरचां घर,
कितां सांगों तेची सर?
आठवण येसे अणि मोग
चित्त उरत नाय थारेवर....१

दारांत उभो प्राजक्त
करसे सगळेंचां स्वागत,
सुवास बरो येसे तेचो,
घरा-दारात, पोरसुवात...२

सोबतीला तेचे उभी,
दारांत से एक तुळस,
जीव हसे कासावीस
यवजुनी जुने दिवस...३

माझे माहेरचे घरा,
एक जुनीच से रीत,
प्रत्येकाचां स्वागत त्याहां
आनंदान हसे सदोदित...४

असे ते घरात आमी
सगळीच भावंडां खेळलों
पुण्याई म्हणेवी आमची,
आमी त्यांहांच जन्मलों....५

संध्याकाळां हंत ससे,
सदांच त्यांहां तेलवात,
परवचा आमी म्हणत सलों
बरे मोठे आवाजात....६

बालपणाच्यो ह्यो अशो
कितक्योशोच आठवणी,
निरोप त्यांहांचो घेताना,
डोळेंत येसे अजुनी पाणी,
डोळेंत येसे अजुनी पाणी...७

**सौ. पूजा विष्णू मराठे** – सारवळी, गोवा.
फोन: ७०८३०७८६२१

# श्री आगमन

काल माजे स्वप्नांत गणपती बाप्पा आयलो
येसां में अवघे दिवसांनी असां सांगो लागलो ||ध्रु||

मोग कशी कितां सुरू से तयारी, असांय विचारीत सलो
अधिक काय नाकां, मनापाश्णी भक्ती कर म्हणत सलो ||१||

जमला ते इतकांच कर
तांबड्या जस्वंदीचा फुल, केगद अणि कमळ,
माला मात नक्की अर्पण कर
नाकां ती कापेतिची फुलां अणि हार
तेपेक्षा बऱ्यो तांबड्यो, अक्षता घाल चार ||२||

पाचव्योच आरोग्यवर्धक दूर्वा बी हाड!
नैवेद्याला जां रांधशील तांय थोडां वाढ
खोबरा- गॉड पुरणांचे, उकडीचे मोदक कर
तेवर साजूक गावठी तुपाची धार धर
पंचखाद्यय चालेल एखादो दिवस...! दाखय नैवेद्य, थेव्नी तेचेवर तुळस ||३||

माज्यो चार काण्यो, भुर्गेना बेसव्नी सांगा
कळोंदेत तेनाय बी, माजी सगळीं आंगा
पुजुनी शाडूच्या मूर्त्याला, पर्यावरण शिकोया
नैसर्गिक आरास करनीं समतोल राखोया ||४||

ढोल ताशे लेझिम, हि वाद्यां आवडीची
करा माजे कान तृप्त, साथ संगीत सुरांची
हसे त्रास माला आधुनिकतेचे DJ चो
हेचेच साठी सलो का? अट्टाहास टिळकांचो
थोडो करा विचार, तेंचे दूरदर्शी विचारांचो ||५||

करा हौस तुम्ला हवी ती, नाकां केवळ नखरे
तकल्यावर बर्फ, जिबल्यावर साखर थेव्नी
सगळे उत्सव आनंदान, करा साजरे ||६||

देन तुम्ला आशीर्वाद भरभरूनी में
सुखकर्ता में दुःखहर्ताय बी में
येनांर सां तुमचेत्या लोक्कोरच में ||७||

पहाटी स्वप्नांत्थीन जागी जाल्यां
स्वप्न सरला, नदर उरली, ओठांनी म्हटलां
गणपती बाप्पा मोरया..!
तुजे आगमनाचे वाटावर, मन आतुर गणराया ||८||

**सौ. मिनल आगाशे** - पुणे
चित्पावनी अनुवाद : सौ. आरती मोने, गोवा

गणपुले फाउंडेशन
फोन: +९१ ९९२० ३४५ ८६१
ईमेल: info@ganpulefoundation.org

चित्पावनी बोली भाषे बद्दल जे उपक्रम गणपुले फाउंडेशन द्वारे घेतले जातात त्याची माहिती मिळत राहाण्यासाठी खाली दिलेल्या लिंक वर क्लिक करून गणपुले फाउंडेशन च्या फेसबूक पेज ला फॉलो करा.

## चित्पावनी च्या संवर्धनासाठी गणपुले फाउंडेशन चे उपक्रम

- चित्पावनी भाषेची तोंड ओळख – ऑनलाईन कार्यशाळा
- चित्पावनी पाठयक्रम
- चित्पावनी त्रैमासिक
- चित्पावनी दिवाळी अंक
- चित्पावनी संभाषण शिबिर
- www.chitpavani.org या संकेतस्थळाची सुरुवात